ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २० ऑगस्ट, १९५२ अंक ३४

## विविध माहिती

**खेळाच्या सामानाला मागणी**— ऑलिंपिक सामन्यांत हिंदच्या हॉकी संघानें आपलें अजिंक्यपद कायम ठेवल्याचा एक परिणाम असा झाला आहे कीं हिंदमधील हॉकीच्या काठ्यांना चांगली मागणी येऊं लागली आहे. डच खेळाडू तर भारतीय हॉकीच्या काठ्यांचाच आग्रह धरतात. ह्या काठ्यांशिवाय ब्रिटन भारताकडून फुटबॉल्स, टेनिस रॅकेटस्, क्रिकेटचे चेंडू, इत्यादि साहित्य आयात करतें. अमेरिका भारताकडून बॅडमिंटनच्या ४,००,००० रॅकेटस् दरवर्षी घेते.

**कृत्रिम तुपाचा कारखाना**— मद्रास राज्यांत कोझिकोड येथें राज्य सरकारच्या मालकीचा कृत्रिम तुपाचा एक कारखाना आहे. तो ह्यापुढें सरकारनें चालवावा कीं एखाद्या खाजगी कंपनीला चालविण्यास द्यावा, ह्यासंबंधीं सध्या विचार चालू आहे कारखान्याची सद्य:परिस्थिति तपासण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

**मध्यवर्ती वैद्यकीय संस्था**—सफदरगंज, दिल्ली येथें बांधण्यांत यावयाच्या सेंट्रल मेडिकल इस्टिट्यूट ह्या संस्थेच्या इमारतीच्या बांधकामाला लवकर सुरुवात होईल. ह्या संस्थेला न्यूझीलंडच्या सरकारनें १० लाख पौंड मदत दिली असून बाकीचा खर्च भारतीय सरकार करणार आहे. संस्थेंत मुख्यत: पदवीनंतरच्या शिक्षणाची सोय होईल.

**राजेसाहेबांसाठीं खास विमान**—सौदी अरेबिआचे राजे इब्न सौद ह्यांच्यासाठीं एक खास विमान कॅलिफोर्निआंतील एका कारखान्यांत बांधण्यांत येत आहे. विमानांत सिंहासनवजा एक खुर्ची मुद्दाम बसविण्यांत येणार आहे. ह्या विमानांत बसून राजेसाहेब आपली दरवर्षींची मक्केची यात्रा करतील.

**मद्यपानविषयक परिषद**—१९५३ च्या मे महिन्यांत जागतिक आरोग्य संघटनेतर्फे मद्यपान–विषयक एक परिषद ब्यूनॉस एरिस येथें भरविण्यांत येणार आहे. अमेरिकेंतील येल विद्यापीठांत मद्यपान–विषयक बाबींचा अभ्यास करण्याची सोय आहे. विद्यापीठाच्या उन्हाळी बैठकींत वरील घोषणा करण्यांत आली.

**कोरिआंतील युद्धाचा जपानला फायदा**— कोरिआंतील युद्ध सुरू झाल्यापासून जपानचा सुवर्णसंचय वाढूं लागला आहे. आज ब्रिटनजवळ सुमारें १ अब्ज ७० कोटी डॉलर्स किंमतीचें सोनें आहे तर जपानजवळ सुमारे १ अब्ज डॉलर्स किंमतीचें सोनें असून तें अधिक वाढत आहे. जपाननें ब्रिटनकडून कॉमेट जातीचीं दोन जेटचीं विमानें खरेदी करण्याचें ठरविलें आहे.

**सायकल वापरण्यासाठीं परवाना**— अंबाला नगरपालिकेनें सायकलींवर कर बसविण्याचें ठरविलें आहे. सायकली वापरणारांनीं नगरपालिकेकडून परवाना घेतला पाहिजे आणि सायकलीला घंटा व ब्रेक्स असलेच पाहिजेत असाही नियम करण्यांत आला आहे.

**जपान–भारत औद्योगिक सहकार्य**— जपान आणि भारत ह्यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्य घडवून आणण्याच्या हेतूनें भारतीय उद्योगपतींचें एक अभ्यास मंडळ जपानला रवाना झालें आहे. ह्या मंडळांत सहा प्रतिनिधी असून त्यांत सुताच्या गिरण्या, वीजेसंबंधीचे कारखानदार आणि व्यापारी ह्या व्यवसायांचे लोक आहेत.

**करासंबंधी चौकशी–कमिटी**— भारतीय सरकारचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं नुकतेच असें सांगितलें कीं, सर्व देशांत एकाच प्रकारची करपद्धति अंमलांत आणणें कितपत शक्य आहे ह्यासंबंधी आणि इतर बाबींसंबंधीं तपशीलवार विचार करण्यासाठीं सरकार एक चौकशी–कमिटी लवकरच नेमणार आहे.

**अर्थमंत्र्यांचें संस्कृत प्रेम**— कर्नाटकांत 'मधुरवाणी' ह्या नांवानें निघणाऱ्या संस्कृत मासिकाला भारत–सरकारचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं १०० रुपयांची देणगी दिली. श्री. देशमुख रिझर्व्ह बँकेचे सभासद असतांनाच १५० रुपये देऊन ह्या मासिकाचे आजीव सभासद झालेले आहेत.

**पेकिंगमधील हवाई कवाईत**— पेकिंगमध्यें चीनच्या हवाई दलाची पहिली कवाईत नुकतीच करण्यांत आली. ह्या कवाइतींत दोन चिनी स्त्रियांनीं हवाई छत्रीच्या साह्यानें विमानांतून उड्या मारल्या. चीनचे हवाई दल आणि त्यामधील वैमानिक अद्याप बाल्यावस्थेंत आहेत तथापि कवाईत पहाण्यास लाखों नागरिकांची गर्दी झाली होती

**कॉकेशस पर्वतावर स्टॅलिनचा पुतळा**— रशिआंत व्होल्गा डॉन कालवा ज्या दिवशीं खुला करण्यांत आला त्या दिवशीं कांहीं गिर्यारोहकांनीं कॉकेशस पर्वताच्या ११,००० फूट शिखरावर चढून तेथें मार्शल स्टॅलिन ह्यांचा पुतळा उभारला असें समजतें.

**पं. नेहरूंच्या स्वाक्षरीची किंमत**— पं. नेहरूंची सही असलेली एक दहा रुपयांची नोट प. बंगालचे गव्हर्नर डॉ. मुकर्जी ह्यांनीं ३,२०१ रु. ला लिलावांत विकली. क्षयरोग्यांना मदत करण्यासाठीं कलकत्ता येथें एक नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. त्यावेळीं हा लिलांव करण्यांत आला. सही हिंदींत होती.

## टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि.

**३१ मार्च, १९५२ अखेरच्या वर्षाच्या अहवालांतील उद्बोधक माहिती**

**शेअर होल्डर**

कंपनीचे शेअर होल्डर्स २८,४१० आहेत. त्यांची वर्गवारी अशी:—

| शेअर्सची किंमत | भागीदार |
|---|---|
| १००० रु. पेक्षा कमी | १७,४७६ |
| १००० रु. ते ५,००० रु. | ८,३१३ |
| ५,००० रु. ते १०,००० रु. | १४५९ |
| १००० रु. वर | ११६२ |
| | २८,४१० |

**भागांची वर्गवारी**

| | भागीदार | भागांची दर्शनी किं. (रु.) | दर्शनी किंमतीचें प्रमाण% |
|---|---|---|---|
| व्यक्ती | २७,९३६ | ६,७३,८५,८४५ | ६४·४३ |
| बँका | ६० | १,०४,८५,०६० | १०·०२ |
| विमा, इंड. इ. कं. | १४५ | १,७६,०५,१०० | १६·८३ |
| इतर | २६९ | ९१,१८,३९५ | ८·७२ |
| | २८,४१० | १०,४५,९४,४०० | १००·०० |

**जमशेटपूर येथील कामगारांची वार्षिक मिळकत**

| वर्ष | रु. |
|---|---|
| १९३९–४० | ७६८ |
| १९४९–५० | १,६२२ |
| १९५०–५१ | १,८५१ |
| १९५१–५२ | २,१५७ |

**ताळेबंदांतील प्रमुख आकडे**

| देणें | लक्ष रु. | जिंदगी | लक्ष रु. |
|---|---|---|---|
| भांडवल | १०,४७ | भांडवली खर्च | ४४,२२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १२,५५ | स्टॉक्स, स्टोअर्स | १४,१६ |
| घसारा तरतूद | २९,५४ | येणीं | ५,६३ |
| प्लँट रीहॅबिलिटेशन रिझर्व्ह | ७५ | कर-ॲडवान्स | २,१४ |
| कर्जे व ठेवी | २,५३ | इन्व्हेस्टमेंटस | ३,७२ |
| कर-रिझर्व्ह | ३,११ | कॅश | १,९२ |
| देणीं | ९,६५ | | |
| बोनस देणें | १,०७ | | |
| डिव्हिडंड रिझर्व्ह | १,८८ | | |
| | ७२,१३ | | ७२,१३ |

कंपनीनें ३२ कोटी, ६१ लक्ष रुपयांची विक्री केली. एकूण उत्पन्न ३५ कोटी, ७ लक्ष रु. झालें. माल खरेदी, कामगारांचें वेतन, कारखान्याचा खर्च, इतर सर्व खर्च, कर, घसारा, हीं वजा जाऊन २ कोटी, ५३ लक्ष नफा उरला. मॅनेजिंग एजन्सी कमिशन ४७,६२,४२७ रु. झालें त्यापैकीं ७,५०,००० रु. इंजिनिअरिंग व इतर शैक्षणिक सोयींसाठी मॅ. एजंटांनीं न घेतां बाजूस काढून ठेवले आहेत.

### सिनेमा ऑपरेटर परीक्षा-पास पाहिजे

श्री. जयचामराजेंद्र ऑक्युपेशनल इन्स्टिटयूटची सिनेमा ऑपरेटरर्सची परीक्षा किंवा तत्सम इतर परीक्षा पास झालेल्यानाच ह्यापुढें म्हैसूरमध्यें सिनेमा ऑपरेटरचें काम करतां येईल. जे अगोदरच तीन वर्षे ऑपरेटरचें काम करीत असतील, त्यांना हा नियम लागू होणार नाहीं.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन ३२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



**पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.**

४११ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्याचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.


★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.


संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.





# अर्थ

बुधवार, ता. २० ऑगस्ट, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## अमेरिकन अर्थव्यवस्थेचे जागतिक परिणाम

### जागरूकपणाची आवश्यकता

दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवादी गटांतील राष्ट्रांव्यतिरिक्त इतर बहुतेक मोठ्या राष्ट्रांची अर्थव्यवस्था कमी-अधिक प्रमाणांत अमेरिकन अर्थव्यवस्थेशीं निगडित झाली आहे. त्यामुळें अमेरिकन अर्थव्यवस्थेंत पडणाऱ्या भल्याबुऱ्या फरकांकडे सर्वांचें लक्ष लागून रहाणें स्वाभाविकच आहे. ब्रिटनची अर्थव्यवस्था डबघाईला आलेली आह हें आतां उघडच झालें असून ती सावरण्याच्या कामीं आधार म्हणून ब्रिटनला अमेरिकेच्या मदतीकडे पहावे लागत आहे. अर्थात् अमेरिकेची अर्थव्यवस्था दुखणाईत झाल्यास ब्रिटनलाही आर्थिक अवकळा आल्याशिवाय रहाणार नाहीं

ह्या संभाव्य धोक्यासंबंधीं जागरूक रहाण्याचा इषारा दोघा ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांनीं नुकताच दिलेला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठांतील आंकडेशास्त्रज्ञ मि. डडले सिअर्स ह्यांनीं 'ट्रायब्यून' ह्या पाक्षिकांत प्रस्तुत विषयासंबंधीं एक लेख लिहिला आहे. मि. सिअर्स म्हणतात कीं, भावी आर्थिक घडामोडींसंबंधीं फारशी खात्री देतां येत नाहीं हें खरें, पण, जी कांहीं थोडीबहुत देतां येते तीवरून असें दिसतें कीं १९५३ सालीं जगापुढें दोनच पर्याय दिसतातः—पहिला जागतिक महायुद्धाचा आणि दुसरा मंदीचा. १९५३ सालीं अमेरिकेनें आंखलेला शस्त्रीकरणाचा कार्यक्रम ठरवल्याप्रमाणें पुरा होईल. मग काय होईल ? उत्पादनाला दुसरी दिशा न लावल्यास सुमारें ३० लाख अमेरिकन कामगार बेकार होतील ह्याशिवाय अमेरिकेंत सामान्यपणें बेकार असलेले २० ते २५ लाख कामगार असतात, ते वेगळेच ह्यांपैकीं बहुतेक कामगार एक काम सोडून दुसरें धरत असतात. अमेरिकेंत ही परिस्थिति उत्पन्न झाल्यावर तेथें आर्थिक व्यवहार मंदावतील; पण त्याची झळ अमेरिकेला फारशी लागली नाहीं तरी ब्रिटनला मात्र कठीण काळाला तोंड द्यावें लागेल. अमेरिकेंतील उद्योगधंदे मंदावले कीं कच्च्या मालाच्या किंमती एकदम घसरतील. कच्च्या मालाच्या किंमती घसरल्या कीं तो उत्पन्न करणाऱ्या देशांना ब्रिटनकडील व युरोपकडील आपली आयात ताबडतोब खूप कमी करावी लागेल. खुद्द अमेरिकेंत घरच्या बाजारपेठांतील मागणी कमी झाल्यामुळें कारखानदार आयात कमी करूं लागतील आणि आपला माल परदेशीं निर्यात करण्याचे जोराचे प्रयत्न करूं लागतील. त्यामुळें ब्रिटनच्या निर्यातविषयक धंद्यांना धक्का बसेल आणि सार्वजनिक उपयुक्ततेचीं कामें कितीही मोठ्या प्रमाणावर काढलीं तरी ब्रिटनमधील बेकारी कमी होणार नाहीं. म्हणून ब्रिटन आणि प. युरोपमधील देश ह्यांनीं आपआपल्या अर्थव्यवस्था एकमेकांशीं जुळत्या करून जास्तींत जास्त लोकांना काम देण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि अमेरिकेच्या रागालोभाची पर्वा न करतां पूर्व व पश्चिम युरोपांच्या दरम्यान व्यापार-व्यवहार सुरू करून तो झपाट्यानें वाढविला पाहिजे.

मँचेस्टर विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक मि. ऑर्थर लेविस ह्यांनींही अशाच आशयाचा इषारा आपल्या एका लेखांत दिला आहे. ते म्हणतात कीं ब्रिटनमधील कापडाच्या धंद्यांत नुकतीच जी मंदी आली तीमुळें ब्रिटनला चांगलाच धक्का बसला. मंदी आली तर काय उपाय योजावयाचे ते आपणास माहीत आहे असें सर्वचजण म्हणत होते. पण, प्रत्यक्ष मंदी आल्यावर कोणीच कांहीं करूं शकलें नाहीं. १९४९ सालीं अमेरिकेंत आलेली मंदी फार थोडा वेळ टिकली. त्या मानानें १९३७-३८ सालीं जी मंदी आली होती ती दोन वर्षें टिकली. त्या मंदीचा अनुभव लक्षांत घेतला तर असें दिसून येतें कीं इतक्या दीर्घ काल टिकणाऱ्या मंदीमुळें अमेरिकेकडून इतर देशांना जो डॉलर्सचा पुरवठा होतो त्यांत १० अब्ज डॉलर्सची तूट पडते. आज युरोपची परिस्थिति अशी आहे कीं कांहीं माल घेण्यासाठी त्याला डॉलर्स मिळविणें जरूरच आहे. उदाहरणार्थ, गहूं. प्रत्येक युरोपीय देश डॉलर्स मिळविण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न करूं लागला कीं त्याचा शेवट मंदींत होणारच. खुद्द अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांना ह्या परिस्थितीची चांगली जाणीव आहे. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक व सामाजिक समितींत त्यांनीं १९४९ सालापासून उपापयोजना शोधण्याचे प्रयत्न चालविले आहेत. अमेरिकेंत मंदी आल्यास तिचा धक्का बाह्य जगाला न लागण्याइतके डॉलर्स तरी अमेरिकेनें पुरवावे अशी एखादी योजना तयार करण्याची खटपट ते करीत आहेत. १९५० सालीं अशी एक योजना सुचविण्यांत आली होती. पण अमेरिकन प्रतिनिधिमंडळानें ती स्वीकारली नाहीं. आतां अशी योजना सुचविण्यांत आली आहे कीं जरूर पडेल त्यावेळीं अमेरिकेनें इंटरनॅशनल मॉनेटरी फंड आणि इंटर नॅशनल बँक ह्या संस्थांतर्फे गरजू देशांना १० अब्ज डॉलर्स कर्ज म्हणून द्यावें. पण ह्या योजनेला अमेरिकन काँग्रेसची संमति मिळेल कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. तशी ती न मिळाल्यास हा महत्त्वाचा प्रश्न आर्थिक व सामाजिक समितीपुढून काढून घेऊन त्याची चर्चा सरकारी रीत्याच करावी लागेल.

अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या चढउतारावर अमेरिकेची मदत घेणाऱ्या राष्ट्रांची अर्थव्यवस्था कशी अवलंबून आहे तें वरील चर्चेवरून दिसून येते. अमेरिकेंत मंदी आल्यास बाहेरच्या जगाला मिळणाऱ्या डॉलर्समध्यें घट होईल हें तर खरेंच; पण मिळणाऱ्या डॉलर्सची खरेदी करण्याची शक्ति किती राहील हाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. कारण, अमेरिकन अर्थव्यवस्था मक्तेदारी स्वरूपाची असल्यामळें मालाच्या किंमती कृत्रिमपणें चढत्या ठेवून डॉलर्सची खरेदीशक्ति कमी करणें सहज शक्य होतें.

**रेडक्रॉसला अकल्पित देणगी**— कलकत्ता येथील एका दैनिकांत, इंडिअन रेडक्रॉस सोसायटीनें टायपिस्ट-कारकुनाच्या जागेसाठी अर्ज मागवले होते. यशस्वी उमेदवाराला ३०० रुपये अनामत रक्कम ठेवावी लागेल असें सांगण्यांत आल्यानें अर्जदार रागावले. कारण, जाहिरातींत तसा खुलासा नव्हता. आपणास बसचें अगर ट्रॅमचें भाडें मिळावें अशी मागणी कांहीं जणांनीं करतांच त्यांना प्रत्येकीं ४ आणे देण्यांत आले. अर्जदारांनीं पैसे एकत्र करून ते देणगी म्हणून रेडक्रॉस संस्थेला दिले.

## आर्थिक विषमता दूर करण्याचा व विकासयोजनांना पैसा देण्याचा नवा मार्ग

### वारसा कर बिल

लोकसभेंत सादर केलेलें वारसा कर ( इस्टेट ड्यूटी ) विधेयक हें कांहीं अगदींच नवें बिल नव्हे. १९२५ मध्यें पहिल्या प्रथमच त्यावेळीं नेमलेल्या करआकारणी चौकशी मंडळानें अशा प्रकारच्या उपायाची शिफारस केली होती. परंतु १९२८ मधील स्टॅट्यूटरी कमिशनच्या नेमणुकीपासून तों थेट १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट संमत होईपर्यंतच्या विविध घटनात्मक बदलांमुळें ही शिफारस अंमलांत आणतां आली नव्हती.

गेल्या महायुद्धांत अनेकांना बरीच संपत्ति मिळाल्यानें त्या काळांत पुन्हां एकदां हा कर बसवावा असें वाटूं लागलें. परंतु १९३५ च्या कायद्यान्वयें, इंग्लंडमधील अशाच प्रकारच्या करासारखा कर बसवितां येणें शक्य नव्हतें. म्हणून १९४४ मध्यें या कायद्यांत दुरुस्ती करून राज्य सरकारांच्या कक्षेत येणाऱ्या शेतजमिनींव्यतिरिक्त इतर मिळकतींवर हा कर बसविण्याचे अधिकार मध्यवर्ती विधिमंडळास देण्यांत आले.

१९४६ मध्यें मध्यवर्ति विधिमंडळांत, एखाद्या इसमाच्या मृत्यूनंतर त्याची मिळकत दुसऱ्यास मिळतांना हा कर बसविण्याची तरतूद असलेलें बिल मांडण्यांत आलें होतें परंतु अनेक कारणांमुळें त्यावर विचार होऊं शकला नाहीं. हेंच बिल १९४८ मध्यें हंगामी लोकसभेंत मांडण्यांत आलें होतें. चिकित्सा समितीनें सम्मत केलें होतें तरी तें विचारार्थ हातीं घेणें शक्य झालें नाहीं आणि हंगामी लोकसभेच्या विसर्जनाबरोबर तें बिलही रद्द झालें.

आतां लोकसभेंत सादर केलेलें बिल म्हणजे चिकित्सा समितीनें सादर केलेल्या १९४८ च्या बिलाची जवळजवळ पुनरावृत्तीच आहे. त्यांत पुढीलप्रमाणें कांहीं थोडे बदल केले आहेत:–

( १ ) हें बिल पूर्वी तयार करण्यांत आलें त्यावेळीं शेतजमिनींबाबत कायदा करण्याचा अधिकार मध्यवर्ति सरकारला नव्हता; परंतु आतां कांहीं राज्यांनीं घटनेच्या२५२ व्या कलमानुसार आवश्यक ते ठराव संमत केले असल्यानें हें बिल आतां अशा राज्यांतील शेतजमिनींसही लागू करतां येईल. बाकीच्या राज्यांनींही असें ठराव संमत केल्यावर अशा राज्यांचा समावेश करूं देण्याबाबत मध्यवर्ति सरकारच्या पत्रकानुसार परिशिष्टांत दुरुस्ती करण्यांत येईल.

( २ ) मृताच्या जंगम मालमत्तेवर कर बसविणें केवळ त्याच्या कायम निवासस्थानावर (डोमिसाईल) अवलंबून राहील. चिकित्सा समितीनें दुरुस्त म्हणून केलेला प्रत्यक्ष निवासाचा ( रेसिडन्स ) पर्याय गाळून टाकण्यांत आला आहे.

( ३ ) प्राप्तीकर कायद्याप्रमाणेंच कराचा दर व सूट देण्याच्या कमाल मर्यादा या गोष्टी वार्षिक अर्थविषयक कायद्यानुसार ठरविण्यांत येतील.

( ४ ) कारभाराचे सोयींचे दृष्टीनें कर लादण्याचा अधिकार कन्ट्रोलर ऑफ इस्टेट ड्यूटी यांस देण्यांत आला आहे हें नवें खातें असून त्याचें कामकाज मध्यवर्ति महसूल मंडळाच्या अखत्यारीखालीं चालेल.

( ५ ) कन्ट्रोलर ऑफ इस्टेट ड्यूटी यांजकडून येणाऱ्या हुकुमावर मध्यवर्ति महसूल मंडळाकडे अपिलें करतां येतील आणि १९५२ च्या भारतीय प्राप्तीकर कायद्याप्रमाणेंच वरिष्ठ न्यायालयाकडे केवळ कायद्यासंबंधींच्या प्रश्नांचाच निर्देश करतां येईल.

### हेतु आणि कारणें

या बिलाचें उद्दिष्ट, "हेतु आणि कारणें या संबंधींच्या पत्रकांत" म्हटल्याप्रमाणें "एका माणसाच्या मृत्यूनंतर त्याचेकडून जाणाऱ्या वे जात असलेल्या मालमत्तेवर वारसा कर बसविणें हा प्रस्तुत बिलाचा हेतु आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर प्राप्तीकराचे दर वाढवून आणि प्राप्तीकर चौकशी मंडळानें कर चुकविणाऱ्या महत्त्वाच्या प्रकरणीं चौकशी करून उत्पन्नांत वाढ केली असल्यामुळें अगोदरच श्रीमंत असलेल्यांकडे अधिक संपत्ति जमण्यास थोडाफार प्रतिबंध झाला असला तरी संपत्तीच्या वांटणींतील सध्यांची विषमता कमी करण्याचे दिशेनें प्रत्यक्ष करण्यांत आलेली उपाययोजना असें त्यांस म्हणतां येणार नाहीं. वारसा कर बसविल्यानें ही विषमता बऱ्याच प्रमाणांत कमी करतां येईल अशी आशा आहे. आपल्या विकासयोजनांना पैसा पुरविण्यासाठीं अशा उपाययोजनेमुळें राज्यांना साह्य होईल. नियोजन मंडळानें आपल्या कच्च्या मसुद्यामध्यें भारतांत शक्य तितक्या लवकर मृत्यु कर बसविण्याकरतां कायदा संमत करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे.

मूळ गव्हर्नमेंण्ट ऑफ इंडिया ॲक्ट प्रमाणेंच भारतीय घटनेनुसारही शेतजमिनीवरील करआकारणी राज्य सरकारांच्या कायदेविषयक यादींत असून, त्या व्यतिरिक्त मिळकत मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंत येतें. परंतु कर आकारणींत सारखेपणा राखण्यासाठीं मुंबई, उत्तर प्रदेश, ओरिसा, मध्यप्रदेश, हैद्राबाद आणि राजस्थान यांसारख्या अनेक राज्यांनीं घटनेच्या २५२ कलमान्वयें त्यांच्यावतीनें त्यांच्या प्रदेशांतील शेतजमिनींबाबत कायदे करण्याचे अधिकार मध्यवर्ति सरकारला देणारे जरूर ते ठराव संमत केले आहेत.

या बिलान्वयें राज्यांतील शेतजमिनींवरील वसूल झालेला कर त्या त्या राज्यास देण्यांत येईल. शेतीव्यतिरिक्त मिळकतीवरील निव्वळ उत्पन्न, घटनेच्या २६९ व्या कलमाखालीं लोकसभा ठरवील त्या वांटणीच्या तत्वानुसार राज्यांना दिलें जाईल.


## पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें

## नोटीस

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. ची ३५ सावी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक ७ सप्टेंबर १९५२ रोजीं सायंकाळीं ५–३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरेल. या सभेंत सन १९५१–५२ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफावाटणी मंजूर करणें, हिशेबतपासनिसांच्या तपासणी यादींचा विचार करणें, डायरेक्टरांच्या निवडणुकीचे नियम नं. १ व १५ यांतील दुरुस्त्यांचा विचार करणें, पुढील सालासाठीं डायरेक्टर्स, चेअरमन, व्हाईस चेअरमन निवडणें, हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचें वेतन ठरविणें, वगैरे कामें होतील. डायरेक्टरांची व हिशेब तपासनिसांची निवडणूक त्याच दिवशीं व त्याच इमारतींत सकाळीं ८–३० ते १२ वाजेपर्यंत होईल. तरी सदर निवडणुकीस व सभेस सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

पुणें, दिनांक १६–८–१९५२.

## योग्य उपाय-योजनांचा सुपरिणाम

### बँकिंगचा पाया भक्कम करण्यासाठी उपाययोजना

भारतांतील बँका बदलत्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थितीसारख्या बाह्य कारणापेक्षांही त्यांचा अंतर्गत कमकुवतपणा अगर गैरकारभार यांमुळेंच बुडाल्याचें आढळून येतें. त्यामुळेंच या शतकाच्या तिसऱ्या दशकाचे प्रारंभीं अमेरिका आणि इतर कांहीं देशांवर बँका बुडण्याचें मोठें संकट कोसळलें, तसें ह्या देशांवर अजून तरी कोसळलेलें नाहीं.

१९१३,१९१४ व पुन्हा १९३८ मध्यें निघालेल्या बँकांच्या दिवाळ्यानंतर भारतांत बँका बुडण्याचे प्रकार अधूनमधूनच घडतात आणि तेथेंही कमजोर पायावर गुंतविलेलें भांडवल, पैसे देण्याबाबत व्यवस्थापक वर्गास नसलेली पारख आणि अनुभव किंवा झटपट फायद्यासाठी धोकादायक ठरतील असे व्यवहार करण्याची इच्छा अगर पैशाचा अपहार करण्याची स्वार्थबुद्धि, हींच कारणें बँकांचें दिवाळें निघण्यामागें असतात.

इतर देशांशीं तुलना करतां आंतरराष्ट्रीय घटनांचा भारतीय बँकांवर परिणाम होत नाहीं ही गोष्ट एका दृष्टीनें फायद्याचीच ठरते. कारण, बँक बुडीचीं कारणें मग अंतर्गतच असल्यामुळें राज्यकर्त्यांस त्यावर उपाययोजना करणें अधिक शक्य होतें. तथापि तें कांहींही असलें तरी, बँकांवर नियंत्रण असणें अत्यावश्यक आहे. कारण, भारतांत एकादी बँक बुडल्यानें ठेवीदारांस त्यांनीं मोठ्या कष्टानें बचत केलेल्या पैशास तर मुकावें लागतेच पण भारतांत बचत करण्याची संवय अधिक चांगली वाढीस लागली नसल्यानें देशांतील एकूण बँकिंग पद्धतीवरही त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. तसेंच बँकेचें दिवाळें वाजल्यानें बचत केलेल्या पैशाची हानी होते इतकेंच नव्हे तर पुढील काळांत बचत करण्याच्या प्रमाणासही धक्का बसतो. यावरून ठेवीदारांमध्यें, आपल्या हितसंबंधाचें निश्चितपणें रक्षण केलें जात आहे असा विश्वास निर्माण करणें ही गोष्ट बँक नियंत्रण करतांना सर्वांत महत्त्वाची समजली पाहिजे.

### सुरवातीला बुडालेल्या बँका

या देशांतील बँकांचा धंदा खाजगी स्वरुपाचा असून १९१३ व १९१४ मध्यें अनेक बँका बुडाल्यानंतर जनतेनें त्यावर जोरदार टीका केली व त्याकड सरकारचें लक्ष वेधलें, तराहि बँकिंगपद्धतींतील दोष व बँका बुडण्याचीं कारणें शोधून काढण्यासाठी १९२१ पर्यंत इंडियन सेंट्रल बँकिंग कमिटीची स्थापना करण्यांत आली नव्हती. या समितीनें केलेल्या अनेक शिफारशी १९३६ मध्यें दुरुस्त करण्यांत आलेल्या इंडियन कंपनीज ॲक्टांत समाविष्ट करण्यांत आल्या.

तत्पूर्वी १९३४ मध्यें संमत झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या कायद्यान्वयें रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली होती. परंतु इंडियन कंपनीज ॲक्टानें सर्व पळवाटांचा पुरता बंदोबस्त झाला नसल्याचें लवकरच दिसून आलें आणि १९३८ मध्यें लहान प्रमाणावर कां होईना, पण दक्षिण भारतांतील अनेक बँका बुडण्याची परिस्थिति निर्माण झाली. यामुळें प्रस्तुत कायद्यांत १९४२ मध्यें आणखी दुरुस्त्या कराव्या लागल्या.

### युद्धकाळांतील वाढीचे धोके

युद्ध आणि त्यावेळची परिस्थिति यांमुळें बँकिंग पद्धतींत कांहीं गंभीर स्वरूपाचे धोके उत्पन्न झाले. त्या काळांतील जादा उत्पन्न आणि सट्टेबाजीस असलेली अनुकूलता यांमुळें बँकांत मोठ्या ठेवी ठेवण्याची प्रवृत्ति लोकांत निर्माण झाल्यानें तो काळ बँकांच्या विकासास फारच अनुकूल ठरला. विशेषतः १९४२ व १९४३ मध्यें अनेक नवीन बँका उघडण्यांत आल्या आणि १९३९ मध्यें बँक कचेऱ्यांची संख्या २,००० होती ती वाढून १९४६ मध्यें ५,५०० झाली. यांपैकीं बरीच वाढ अव्यवस्थित स्वरूपाची आणि सदोष होती. मोठ्या शहरांत तर निष्कारण बऱ्याच बँका चालू झाल्या आणि त्यामुळें अधिक आकर्षक व्याजाचा दर देऊं करून ठेवींसाठी विलक्षण चुरस सुरू झाली.

बाहेरील प्रदेशांत तर अज्ञ लोकांकडून रकमा गोळा करण्याच्या एकमेव उद्दिष्टानें जाहिरातबाजी व प्रचाराचा नगारा वाजवून अनेक बँकांच्या शाखा सुरू करण्यांत आल्या. पुरेशा ठेवी गोळा झाल्यानंतर पूर्व सूचना न देतां यांपैकीं अनेक शाखा बंद करण्यांत आल्या. बँकिंगच्या नेहमींच्या पद्धतीचा कांहींच विचार न करतां अशा शाखा उघडण्यांत आल्या होत्या आणि या बाबतींतलें टोकाचें उदाहरण म्हणजे एकूण २ लाख रुपयांहूनही कमी भांडवल असलेल्या परंतु ७५ शाखा उघडलेल्या एका बँकेचें आहे कांहीं लहान बँकांची भांडवल—व्यवस्था अशा प्रकारें कच्ची होती तर नवीन स्थापन केलेल्या बँकांत जादा भांडवलाची भर पडली होती. तसेंच युद्ध काळांत झालेल्या वाढीचा हा वेग लक्षांत घेतां, भक्कम पद्धतीच्या बँकिंगला लागणाऱ्या पुरेशा शिक्षित नोकरवर्गाची जरूर ती सोय न करतांच ती केली असावी हें उघड आहे

### प्रतिक्रियेस आरंभ

युद्ध संपतांच या घाईगर्दीनें केलेल्या वाढीविरुद्ध अपरिहार्य अशी प्रतिक्रिया चालू झाली. या काळांत बँकांना जादा ठेवी गोळा करणें पूर्वीइतकें सोपें राहिलें नाहीं आणि त्यांपैकीं कांहीं बँकांजवळ तर पुरेसें खेळतें भांडवल न राहतां, लोकांचीं देणीं मात्र त्यांच्याकडे राहिल्यानें त्यांची गोंधळल्यासारखी परिस्थिति झाली. उत्पन्नाचा संकोच झाल्यानें किफायतशीर नसलेल्या अशा वाढीचा परिणाम बँकांना चांगलाच जाणवूं लागला आणि कांहीं बँकांना तर पैसे देण्याचे नेहमींचे व्यवहार करणेंही अवघड होऊन बसलें आणि असें असूनही रिझर्व्ह बँकेनें दिलेला सल्ला न मानतां कांहीं बँका शेअर्सवर पैसे देत आणि शेअर बाजारांतील व्यवहार करीत राहिल्या. सहाजिकपणें अनेक लहान बँकांना, विशेषतः बंगालमधील अशा बँकांना १९४६ च्या अखेरीस शेअर बाजारांतील मंदीचा चांगलाच तडाखा बसला.

१९४७ मध्यें झालेली देशाची फाळणी आणि त्या मागोमाग झालेली सार्वत्रिक दंगल यामुळें विशेषतः पंजाब आणि पश्चिम बंगालमधील बँकिंग पद्धतीमधील कमजोरपणा दिसून आला. गैरवाजवी धोरणानें आपले व्यवहार चालविणाऱ्या अनेक लहान बँकांचा या घटनांत तग धरण्याची पंचाइत आली, तर कांहीं मोठ्या शेड्यूल्ड बँकांस व इतर कांहीं बँकांना पाकिस्तानांतील येण्यांत कांहीं प्रमाणांत तोटा सहन करावा लागला. पश्चिम बंगालमध्यें कांहीं प्रमाणांत फाळणीनंतरच्या घटनांमुळें, परंतु प्रामुख्यानें त्यांच्याच नैसर्गिक कमकुवतपणामुळें चार शेड्यूल्ड बँका बुडाल्या तर इतर अनेक बँकांनीं पैसे देण्याचें स्थगित केलें. १९४७ पासून पुढील पांच वर्षांत स्वखुषीनें अगर सक्तीनें व्यवहार गुंडाळलेल्या बँकांची संख्या पुढीलप्रमाणें आहे:—

१९४७ – २२ बँका; १९४८ – ३६; १९४९ – ४४; १९५० ३१; १९५१ – २३. एकट्या पश्चिम बंगालमधील ही संख्या पुढीलप्रमाणें आहे. १९४४ – २० बँका; १९४८ – २६; १९४९ – २८; व १९५० – ९.

### सरकारचा हस्तक्षेप

युद्धकाळांत बँकांची अपाऱ्यानें परंतु सदोष होत असलेली वाढ पाहून भारत सरकारला इंडियन कंपनीज ॲक्टांत आणखी दुरुस्ती करणें जरूर आहे असें वाटून बारीकसारीक कंपन्यांच्या वाढीस प्रतिबंध करण्यासाठी भारत संरक्षण कायद्यानुसार भांडवल उभार ण्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकारही आपल्याकडे घ्यावा लागला. तथापि या उपाययोजनांचा विशेष फायदा झाला नाहीं आणि बँकांनीं इतर कंपन्यांचे भाग मोठ्या किंमतीस विकत घेऊन त्यांवर आपलें नियंत्रण आणण्यासाठी सार्वजनिक पैशाचा वापर केल्याचीं अनेक उदाहरणें आढळून आलीं. बँका आणि इतर कंपन्यांचे भाग एकमेकांत अडकून राहिल्याचा आणि सट्टेबाजीसाठी आगाऊ पैसा अगर असुरक्षित कर्जे देणें यांसारख्या नियमाबाहेरील गोष्टी छपविण्यासाठी अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा अवलंब करण्यांत आल्याचा पुरावा उपलब्ध आहे


खऱ्या अर्थी प्रतिबंधात्मक म्हणतां येईल असे दोन कायदे करण्याचें काम १९४६ मध्यें हातीं घेण्यांत आलें. बँकिंग कंपनीज (रिस्ट्रिक्शन ऑफ ब्रॅन्चेस) ॲक्ट १९४६ व बँकिंग कंपनीज (इन्स्पेक्शन) ऑर्डिनन्स हे ते दोन कायदे होत. हे दोन कायदे १९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टांत समाविष्ट करण्यांत आले आणि त्यानुसार बँकांनीं नवीन शाखा उघडण्यावर नियंत्रण करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला देण्यांत आला. १९५० मध्यें या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन त्यानुसार भारताबाहेर भारतीय बँकांच्या शाखा उघडण्यावर नियमन ठेवण्याचा अधिकारही रिझर्व्ह बँकेला देण्यांत आला.

नवीन शाखा उघडणें ही एक अत्यंत महत्त्वाची अवस्था असून यावेळीं रिझर्व्ह बँकेला सदरहू बँकेच्या अंतर्गत व्यवहारावर परिणामकारक नियंत्रण करतां येतें. युद्ध काळांत आणि त्यानंतर अशा अनेक नव्या शाखा उघडण्यांत आल्या असून त्यांतील अनेक सदोषच होत्या. १९३९ मध्यें शेड्यूल्ड व नॉन-शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची देशांतील एकूण संख्या १,९५१ होती. ती १,९४६ मध्यें ५,५२१ वर गेली. याबाबतींत देशाच्या जास्तींत जास्त गरजा यापेक्षां कितीतरी पटींनीं असल्या तरी अशी वाढ कांहीं एका दिवसांत होऊ शकणार नाहीं. त्याशिवाय नवीन शाखा सर्व ठिकाणीं सारख्या प्रमाणांत उघडल्या गेल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, या देशांतील जवळ जवळ २,५०० मोठ्या गांवांपैकीं १,००० गावांत बँका मुळींच नाहींत आणि बँक कचेऱ्यांपैकीं ७० टक्के कचेऱ्या मुंबई, बंगाल, मद्रास, उत्तर प्रदेश व त्रावणकोर-कोचीन या राज्यांत आहेत. इतर शहरी विभागांत त्यांचें प्रमाण यापेक्षा कमी आहे.

### नवीन शाखांसंबंधीं धोरण

ज्या ठिकाणीं कोठल्याही बँकेची सोय नाहीं अगर बँकिंगच्या अधिक सोयींसाठी जेथें वाव आहे अशा ठिकाणीं नव्या कचेऱ्या उघडण्यास उत्तेजन देण्याचें रिझर्व्ह बँकेचें धोरण आहे. असें करतांना ग्रामीण विभागांस प्राधान्य दिलें जातें तथापि लहान बँका असूनही मोठ्या व भक्कम पायावर उभ्या असलेल्या बँकेची शाखा नसलेल्या ठिकाणीं अशा बँकेस आपली शाखा उघडूं देण्यांत येते. कारण असें केल्यानें त्या विभागांतील बँकिंग पद्धतीस हितकारक वळण मिळण्याची शक्यता असते. विशेषतः भरपूर प्रमाणांत भांडवल व ठेवी नसलेल्या स्थानिक बँकांस आपल्या वाढत्या स्थानिक गरजा भागविण्याचे दृष्टीनें हें फायदेशीर होतें डिसेंबर १९५१ ला संपलेल्या पांच वर्षांत भारतांत ८८५ नव्या शाखा उघडण्याचे अर्ज रिझर्व्ह बँकेकडे आले होते व त्यांतील ६०८ शाखा उघडण्यास परवानगी देण्यांत आली.


SAVE to help yourself and the NATION



WITH THE HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum


भारताबाहेर भारतीय बँकांच्या शाखा उघडूं देण्याचें गमक अधिक कडक आहे. कोणत्याही देशांतील परकीय बँकांच्या कचेऱ्या नेहमीच राजकीय दृष्ट्या लोकांच्या लक्षांत येतात. त्यामुळें त्या कोणत्याही बाबतींत कमी न पडूं देणें सर्वांत महत्त्वाचें आहे. परदेशांत उघडण्यांत येणारी भारतीय बँकेची शाखा या कसोटीस उतरेल, हें रिझर्व्ह बँकेला पहावें लागतें.

### तपासणीचे अधिकार

१९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टांत दिलेल्या अधिकारान्वयें रिझर्व्ह बँकेला जरूर वाटल्यास, संबंधित बँकेचीं दप्तरें व हिशेब तपासून सर्व बाबतींत तिचा दर्जा चांगला असल्याची खात्री करून घेतां येते. अर्जदार बँकेचें भांडवल इतिहास, तिच्या व्यवस्थेचें सर्वसाधारण स्वरूप, तिची भांडवली रचना, पुढील काळांतील संभाव्य उत्पन्नाची शक्यता आणि तिच्या शाखा काढल्यामुळें जनतेची होणारी सोय अशा कांहीं महत्त्वाच्या गोष्टी त्या बँकेला शाखा उघडण्यास मान्यता देण्यापूर्वीं रिझर्व्ह बँकेला विचारांत घ्याव्या लागतात. अशा अर्जाची छाननी व ठराविक मुदतीनें बँकांची तपासणी केल्यानें त्यांच्या अंतर्गत कारभारासंबंधीं रिझर्व्ह बँकेला बहुमोल अशी माहिती मिळते आणि त्यावरून त्या त्या बँकेचें स्थैर्य अगर कमजोरी ठरवितां येते.

### मोठा धोका टळला

१९४९ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टाची अंमलबजावणी सुरू होऊन तीन वर्षें झालीं असलीं तरी त्यामुळें होणारे सुपरिणाम लगेच दिसून येणार नाहींत. एका विशिष्ट हेतूसाठी ठरविलेल्या आर्थिक धोरणाचा संकलित परिणाम घडून येण्यास कांहीं अवधी लागत असतो. परंतु देशांतील बँकिंग पद्धतीस स्थैर्य आणण्याचे कामीं रिझर्व्ह बँकेकडून होणाऱ्या बँकांच्या तपासणीमुळें चांगलीच मदत झाली आहे. या तपासणीमुळें रिझर्व्ह बँकेला प्राथमिक अवस्थेंतच बँकेंतील दोष सुधारून कमकवत पद्धतीवर व्यवहार करणाऱ्या बँकांविरुद्ध बँकिंग कंपनीज ॲक्टांतील तरतुदी लागू करतां येतात बँकांचें एकत्रिकरण करण्याच्या तंत्रांतील सुटसुटीतपणामुळें कांहीं बँका सक्तीनें बंद करण्याचेंही टळलें कलकत्त्यांतील चार मोठ्या बँकांचें योग्य वेळीं झालेलें एकत्रिकरण आणि दिल्लींतील दोन मोठ्या बँकांचें अंशतः झालेलें विलिनीकरण यामुळें पूर्व आणि उत्तर भारतांतील बँकांवरील मोठें संकट टळलें आहे.

### पहिल्या पृष्ठावर बातम्या

मँचेस्टर गार्डियन हें १३१ वर्षांचें जुनें ब्रिटिश वृत्तपत्र पहिल्या पृष्ठावर बातम्या छापण्यास लवकरच प्रारंभ करणार आहे. दि टाइम्स आणि स्कॉटसम हीं दोनच इतर प्रमुख ब्रिटिश वृत्तपत्रें सध्या पहिल्या पृष्ठावर जाहिराती छापीत असतात.

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, वडगांव ( मावळ )

मावळ तालुक्यांतील अन्ट्रेन्ड सेक्रेटरीसाठी व व्ह. फा. पास झालेल्या विद्यार्थ्यांकरितां ७-८-५२ पासुन वडगांव येथें पुणें सें. को. बँकेच्या वडगांव शाखेच्या ऑफिसमध्यें क्लास सुरू झाला.

सदर क्लास ता. ७-८-५२ पासून ता. २१-९-५२ अखेर चालणार आहे. क्लासचें उद्घाटन मे. पी. एन्. कुलकर्णी मामलेदारसाहेब मुळशी यांचें हस्तें झालें. समारंभास गांवांतील प्रतिष्ठित मंडळी व सो. चे चेअरमन, सेक्रेटरी वगैरे मिळून ३०-४० मंडळी हजर होती. मे. को. ट्रे. इन्स्पेक्टर, सुपरवायझर व बँक एजंट यांचीं भाषणें झालीं. वर्गांत एकंदर २२ विद्यार्थी आहेत. परीक्षेच्या तारखा व कंडक्टरचें नांव मागाहून कळविण्यांत येईल. वडगांव हें ठिकाण मुंबई-पुणें रेल्वेलाईनवर असून पुण्याहून लोकलची सोय आहे.

क्लासची वेळ सकाळीं ९॥ ते २॥ असते.

दर सोमवारीं आठवड्याची सुट्टी असते.

K. B. Deshpande.
सेक्रेटरी
पुणें जिल्हा सहकारी बोर्ड, लि. पुणें,

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास : नोटीस

नाशिक जिल्ह्यासाठी सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास, सिन्नर येथें तारीख ३१-८-१९५२ पासून, दीड महिना मुदतीचा, घ्यावयाचा आहे. ज्या उमेद्वारांना सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर (२१७८, मधली होळी ) नाशिक यांचेकडे, ता. ३०-८-१९५२ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ लगत पाठवावी. क्लास फी शिवाय अर्ज विचारांत घेतला जाणार नाहीं. उमेद्वारांचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेद्वारांनीं अर्जांत नांव, शिक्षण, वय, पूर्ण पत्ता आणि संस्थेंत काम करीत असल्याबद्दल दाखला जोडून, सर्व खुलासा करावा. उमेद्वारांस सदर शिक्षण स्वःखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासाचे मुदतींत, परीक्षा फी रु. ३ भरावी लागेल, त्याशिवाय परीक्षेस बसतां येणार नाहीं. क्लासानंतर परीक्षेंत यशस्वी उमेद्वारांना सेक्रेटरी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल. उमेद्वारांनीं सिन्नर तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायाझिंग यूनिअनचे ऑफिसांत, समक्ष, तारीख ३१-८-१९५२ रोजीं, ११ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

या सिन्नर सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें उद्घाटन दिवाण बहादूर आर. व्ही. वंडेकर, नाशिक, यांचे हस्तें होणार आहे आणि त्या वेळीं प्राध्यापक एस. जी. पुराणिक, हेही उपस्थित राहणार आहेत.

| | |
|---|---|
| एन. वाय. कुलकर्णी. | वामनराव गोविंदराव पाटील. |
| को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग· | चेअरमन |
| इन्स्पेक्टर, नाशिक | नाशिक डिस्ट्रिक्ट को. बोर्ड लि. |

### मॅट्रिक-पास व पदवीधर ह्यांची बेकारी

मॅट्रिक-पासांत बेकारी वाढत आहे. एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेस-मध्यें मे, १९५२ अखेर नोंदलेल्या ३६,६६,५९५ बेकारांत १,०१,०३८ मॅट्रिक पास होते व १४,८२८ पदवीधर होते. प. बंगालमध्यें बेकार पदवीधर ज्यास्त होते, तर मद्रासमध्यें बेकार मॅट्रिक-पासांचा भरणा मोठा होता. मद्रास, उत्तर प्रदेश, प. बंगाल, मुंबई व दिल्ली येथें बेकारीचें प्रमाण ज्यास्त आढळतें. दरसाल ३०,००० पदवीधरांना मागणी असते, पण विद्यापीठांतून ४५,००० पदवीधर बाहेर पडतात.

# Notice To The Contractors.

(1) Sealed Item rate Tenders endorsed as "Tenders For The Poona District Co-operative Purchase and Sale Union's Godown Work" are invited from the approved contractors for the work of constructing a godown building for the Poona District Co-operative Purchase and Sale Union Ltd., at C. S. No. 114 and 125 Bhawani Peth, Poona 2.

(2) ( i ) Fee for blank forms of Tenders with schedule of rates Rs. 10/-.
( ii ) Estimated cost. Rs. 57,289/-.
( iii ) Earnest money. Rs. 573/-.
( iv ) Security Deposit. Rs. 2,864/-.
( v ) Period of issuing Tender Forms during office hours from 11 A. M. to 6 P. M. 18th August 1952 to 25th August, 1952.
( vi ) Last date of receiving tender, 26th August, 1952 before 5 P. M.
( vii ) Time alloted for the completion of work-Six months since the date of order to commence the work.

(3) *Note* :—Tender form, schedule of quantities, agreement draft, condition of contract, drawing specifications can be seen in the office during the office hours.

(4) Earnest money must be paid before the tender is given by the contractor without which the Tender will not be accepted and considered.

(5) Right to reject any or all Tenders without assigning any reason for the same is reserved.

(6) No addition or alteration will be made in the form of the Tender.

Sd/-. Y. D. Khole,
*Chairman.*
The Poona District Co-operative Purchase and Sale Union Ltd.,
125, Bhawani Peth, Poona 2.

## सह्याद्रि विमा कंपनीचें तिसरें यशस्वी मूल्यमापन

शनिवार ता. २६ जुलै १९५२ रोजी भागीदारांच्या भरलेल्या सर्व साधारण सभेमध्यें कंपनीचे विमातज्ज्ञ श्री के. ए. पंडित यांनीं ता. ३१-१२-५१ पावेतोंच्या केलेल्या मूल्यमापनाचे अहवालास सर्वानुमतें मंजुरी देण्यांत आली. १,४३,७२,३४८ रु. किंमतीचीं ११,७३१ विमाकरार पत्रें व सात वर्षासनांचीं विमापत्रें मूल्यमापनासाठी होतीं. ओरिएंटल मृत्यूचें प्रमाण, ३·२५ टक्के व्याजाचा दर व २० आणि १५ खर्चाची तरतूद धरून मूल्यमापन करण्यांत आलें ही तरतूद गेल्या दोन मूल्यमापनांपेक्षा अधिक पढत आहे. बँकेचा व्याजाचा दर ३·५ टक्के झाल्यानें सरकारी कर्जरोख्यांचे भाव एकदम घसरले व त्यामुळें कंपनीला रु. १,७१,७८० घसारा म्हणून राखून ठेवावे लागले. याशिवाय नवीन विमा कायद्यांतील बंधनांमुळें एजंटांकडून येणें रकमेसाठी रु. १,४७,८९६, विशेष खर्चासाठीं म्हणून रु ३६,५००, तसेंच निगेटिव्ह व्हॅल्यूज, क्लेम भरपाई, पेडअप व रद्द पॉलिसीज, कायम पंगूपणा वगैरे बाबींसाठी राखून ठेविलेल्या निरनिराळ्या रकमाशिवाय इन्कमटॅक्ससाठी रु. ८,००० बाजूस ठेविले आहेत. इतक्या विविध प्रकारच्या रकमा बाजूस ठेवूनही कंपनीचें मूल्यमापन अत्यंत यशस्वी झालें. भागीदारांना करमाफ शें. ३ प्रमाणें नफा व विमेदारांना दरसाल दर हजारीं रु. ५ ते ६ याप्रमाणे इंटेरिम बोनस मंजूर करण्यांत आला.

कंपनीच्या स्थापनेपासून आतांपावेतों झालेलीं तिन्हीही यशस्वी मूल्यमापनें अधिकाधिक कडक तरतूद असूनही, एकापेक्षां दुसरें व दुसऱ्यापेक्षां तिसरें कंपनीची अधिक आर्थिक मजबुती दर्शवितात. कंपनीची सारखी समाधानकारक प्रगति होत असल्यानें, सह्याद्रीनें जनतेचा विश्वासही अधिक संपादन केला आहे. भारत सरकारचे आतां झालेले मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचें अध्यक्ष म्हणून आजवरचें नेतृत्व व श्री. सौंदणकर आणि श्री. जोशी यांचें व्यवस्थापकत्व यामुळें संस्थेचा भविष्यकाळ अधिक उज्वल झाल्याशिवाय राहाणार नाहीं अशी आम्हांस खात्री वाटते.

---

**फ्रेंच सरकारकडून लॉर्ड रे महाराष्ट्र औ. संग्रहालयास देणगी**

पुणें येथील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयास फ्रेंच सरकारकडून फ्रान्समधील उत्कृष्ट तैलचित्रांच्या रंगीत फोटोंची ३० आल्बम्स देणगी म्हणून देण्यांत आली. सदर देणगी संग्रहालयाचे पालकांचे स्वाधीन करणेंसाठी मुंबई येथील फ्रेंच कॉन्सल मि. ऑरीयुमाँ हे मुद्दाम गेल्या महिन्यांत पुणें येथें आले होते. संग्रहालयाचे एक विश्वस्त श्री ग. रा साठे यांनीं संग्रहालयाचे वतीनें देणगीचा स्वीकार केला व विश्वस्त समितीचे अध्यक्ष श्री. वि न. सरदेसाई, आय. सी. एस्. यांनीं पाहुण्यांचे आभार मानले. देणगी म्हणून मिळालेलीं आल्बम्स अभ्यासूंच्या उपयोगासाठी मांडण्याची लवकरच व्यवस्था करण्यांत येईल

---

**बर्नार्ड शॉ ह्यांचें स्मारक बारगळलें-** दिवंगत नाटककार जॉर्ज बर्नार्ड ह्यांचें स्मारक करण्यासाठी ब्रिटनचे अर्थमंत्री मि. बटलर ह्यांनीं एक मोठा निधी जमविण्याचें ठरविलें होतें २,५०,००० पौंड जमविण्याचा संकल्प सोडण्यांत आला होता. शॉ ह्यांचीं नाटकें करणें, त्यांचें घर सुस्थितींत राखणें आणि नवोदित ग्रंथकारांना मदत करणें, असे निधीचे हेतू होते. पण आजपर्यंत फक्त १०,००० पौंडच जमा झाल्यामुळें स्मारकाबद्दल अनिश्चितता उत्पन्न झाली आहे.


# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

**स्थापना : १९४३**

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

**श्री. बी. बी. पाटील, श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,**

B. A., LL. B., वकील, सांगली — चेअरमन

कोल्हापूर, व्हा. चेअरमन

**एल. एन्. शहा,**

B. Com., C. A. I. B.

मॅनेजर

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. १४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार. व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

**मो. वि. खडे,**

**मॅनेजिंग डायरेक्टर.**


'हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ९२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें